# मुंबई विद्यापीठ

REG/ICC/2020-21/1

परिपत्रक

विषय : राज्यात कोरोना विषाणू (कोव्हीड–१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय

संदर्भ: १) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना–२०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य–५, दिनांक १४/०३/२०२०

२) सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना–२०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य–५, दिनांक १५/०३/२०२०

३) शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकिर्ण–२०२०/प्र.क्र. ६०/२०/ताशि–१ दि. १६/०३/२०२०

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. समय–२०२०/ प्र.क्र. ३५/१८ (र.व का.) दिनांक १८/०३/२०२०

५) संकिर्ण–२०२०/ प्र.क्र. ६०/२०/ता.शि.–१ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन दिनांक १९/०३/२०२०

६) D.O. No. Secy (HE)/MHRD/2020 New Delhi dtd. 21 March, 2020

७) DMU/2020/CR.92/DisM-1, dated 25 March, 2020

८) मुंबई विद्यापीठ परिपत्रक क्र. REG/ICC/2019-20/35 दिनांक ३१ मार्च, २०२०

९) DMU/2020/CR.92/DisM-1, dated 15 April, 2020

१०) उशिसं/कोरोना/२०२०/मवि–१/४०९१, दिनांक १५ एप्रिल, २०२०

उपरोक्त संदर्भाकिंत पत्रांच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, विद्यापीठ उपपरिसरे, आदर्श महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था व विद्यापीठ शैक्षणिक विभागाकरिता परिपत्रक क्र. १ ते ७ अन्वये विद्यापीठाने कोरोना विषाणूच्या प्रसारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत वेळोवेळी परिपत्रके निर्गमित केली होती व उपरोक्त परिपत्रकांतील दिशा निर्देशांचे काटेकोरपणे पालन करण्याचे देखिल सुचित केले होते.

उपरोक्त संदर्भाकिंत पत्र क्र. ८ च्या अनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य व संचालक, मान्यता प्राप्त संस्थांकरिता दिनांक ०१/०४/२०२० ते १४/०४/२०२० हा कालावधी विद्यापीठाने अंतरिम उन्हाळी सुट्टी म्हणून घोषित केला होता.

मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग मंत्रालय, मुंबई यांचे उपरोक्त संदर्भ क्र. ९ अन्वये प्राप्त अधिसुचनेनुसार कोरोना विषाणूचे देशाभरातील वाढते संक्रमण रोखण्यासाठी तेवढयाच तत्परतेने व तीव्रतेने खबरदारी घेणे व विविध प्रतिबंधात्मक उपायांचे काटेकोरपणे पालन करण्यासंदर्भात निर्देशित केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक १५ एप्रिल, २०२० ते ३ मे, २०२० पर्यंत कामकाज बंद (Lockdown) करण्याच्या सुचना प्राप्त झाल्या आहेत. तसेच संदर्भाकिंत पत्र क्र. १० च्या अनुषंगाने उपरोक्त अधिसुचनेतील संबंधित दिशा निर्देशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासंदर्भात विद्यापीठाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य व संचालक, मान्यता प्राप्त संस्था यांना सुचित करण्यात येते की उपरोक्त संदर्भ क्र ८ च्या विद्यापीठ परिपत्रक दिनांक ३१ मार्च २०२० अन्वये दिनांक ०१/०४/२०२० ते १४/०४/२०२० घोषित केलेला अंतरिम उन्हाळी सुटटीचा कालावधी दिनांक ३ मे, २०२० पर्यत वाढविण्यात आलेला आहे. उद्‌भवलेल्या परिस्थितीचे गांभिर्य लक्षात घेवून संबंधित सर्व महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्थांचे सर्व कामकाज घरी राहून (work from Home) होईल. या संदर्भात त्यांनी संबंधित महाविद्यालयांच्या व्यवस्थापनाशी चर्चा करुन आवश्यक कार्यवाही करावी. तद्‌वतच संबंधित जिल्ह्यातील मा. जिल्हाधिकारी / तहसिलदार यांचे संपर्कात राहून त्यांचे निर्देशानुसार कार्यवाही करावी. शासन परिपत्रकातील दिशा निर्देशांचे काटेकोरपणे पालन होईल याची खबरदारी घेण्यात यावी.

या संदर्भात शासनाच्या वेळोवेळी प्राप्त होणा—या निर्देशांबाबत सर्व संबंधितांना आवगत करण्यात येईल.

मुंबई (डॉ. अजय देशमुख)
१५ एप्रिल, २०२० कुलसचिव

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाही करीता :—
प्राचार्य सर्व संलग्नित महाविद्यालये/संचालक, मान्यता प्राप्त संस्था